महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/सीएसएस/२०१४-१५/१४अई/ 7850 दि. १५/०९/२०१४

महत्वाचे / तात्काळ -

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, नांदेड

विषय : सेंट्रल संक्टर शिष्यवृत्ती योजना १४-१५ साठी मुदतवाढ

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१४-१५ साठी महाविद्यालयामार्फत विभागीय कार्यालयात अर्ज जमा अंतिम तारीख १५/०९/२०१४ अशी होती त्याऐवजी ती **०५/११/२०१४** अशी करण्यात आलेली आहे. प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांची माहिती विहीत नमुन्यात भरुन दिनांक-१५/११/२०१४ पर्यंत संचालनालयास हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये खास दूताकरवी सादर करावी. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१४-१५ च्या मुदतवाढीची माहिती व आवश्यक सुचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

आपल्या स्तरावरुन सर्व महाविद्यालयांना परिपत्राकाद्वारे सदर माहिती देण्यात येवुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संचालनालयास पाठविण्यात यावा. कोणत्याही पात्र विद्यार्थ्यास सदर शिष्यवृत्तीपासुन वंचीत राहावे लागल्यास, त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील याची नोंद घ्यावी.

सोबत --- नवीन वेळापत्रक

कार्यालय
विभागिय शि... ...
उच्च ...
आवक : 1066
दिनांक 25/9/14
विभाग शिष्यवृत्ती

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
नोडल ऑफिसर तथा प्र.शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत- प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

## सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती २०१४-१५ साठी मुदतवाढ

| अ. क्र. | कार्यसूची | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी www.dhepune.gov.in या संकेत स्थळावरुन अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन परिपुर्ण रित्या आवश्यक त्या सहपत्रांसह महाविद्यालय / संस्थेच्या प्राचार्यांकडे सादर करणे. | दि.०१/०८/२०१४ ते दि. ३१/१०/२०१४ पर्यंत |
| २ | विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाची महाविद्यालयाने तपासणी करुन अर्जाच्या मुळ प्रती सहपत्रांसह संबंधीत सहसंचालक , उच्च शिक्षण कार्यालयाकडे जमा करण्याचा कालावधी | दि.०१/०८/२०१४ ते दि. ०५/११/२०१४ पर्यंत |
| ३ | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने अर्जाची छाननी करुन त्यास मंजुरी देणे व पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमुन्यतील यादी उच्च शिक्षण संचालनालयास जमा करण्याचा कालावधी | दि. ०१/०८/२०१४ ते दि. १५/११/२०१४ पर्यंत |